RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# ‘माझी समृध्द शाळा’

**डॉ. सौ. मीनाक्षी नंदकुमार मोरे**
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी.

## प्रास्ताविक

‘माझी समृध्द शाळा’ या साधनाद्वारे शाळांनी स्वतःचे मूल्यमापन स्वतः करुन आपली शक्तीस्थाने (Strength )तसेच उणीवा ( Weakness) जाणून घेणे गरजचे आहे, या भूमिकेतून उदयास आले आहे. हे साधन स्वयंमूल्यमापनातून स्वयंविकासाकडे जाण्याचा एक मार्ग आहे. शिक्षकाला व शाळेला चांगले मूल्यमापन करण्यासाठी दिशा, गती व प्रेरणा देणारे, मार्गदर्शन करणारे व शिक्षकाची उच्चतम पातळी गाठण्याची मदत करणारे प्रभावी स्वयंमापन साधन म्हणून उपयुक्त आहे. कारण या साधनाव्दारे स्वतःच्या प्रगतीचे मूल्यमापन स्वतः करता येते. आपली स्पर्धा आपल्याशीच असते. आपण आपले, आपल्या अध्यापनाचे, आपल्या शाळेचे मूल्यमापन स्वतःच करु लागलो तर आपण कोठून आलो, आता आपण कोठे आहोत आणि यात सुधारणा करत आपल्याला कोठे जावयाचे आहे यासाठी प्रयत्नशील राहता येते. यादृष्टीने हे स्वयंमूल्यमापनाचे उत्तम साधन आहे.

## ‘माझी समृध्द शाळा’ या साधनाची रचना

या साधनाची मांडणी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे पुढील चार सर्वमान्य पैलू डोळयासमोर ठेवून केलेली आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये समाविष्ट विकास घटक व निकष व त्यांना असणारे गुण पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | क्षेत्राचे नांव | विकास घटक संख्या | निकष | गुण |
|---|---|---|---|---|
| 1 | पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा (Access) | 21 | 52 | 86 |
| 2 | लोकसहभाग (community Participation) | 5 | 14 | 24 |
| 3 | शैक्षणिक संधीची समानता (Equity) | 6 | 17 | 33 |
| 4 | शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन (Quality) | 10 | 79 | 157 |
| | एकूण | 42 | 162 | 300 |

## गुणांकन व श्रेणी निश्चिती –

प्रत्येक विकास घटकाची मांडणी तीन स्तरावर केलेली असून प्रत्येक स्तरामध्ये निकषांची यादी चढत्याक्रमाने दिलेली आहे व त्यातील निकषांना स्तरनिहाय चढत्या क्रमाने गुण देण्यात आले आहेत. जसे स्तर – 1 साठी 1 गुण, स्तर 2 साठी 2 गुण व स्तर – 3 साठी 3 गुण असे 42 विकास घटक समाविष्ट आहेत. विकास घटकातील सर्व निकष मापनास सुलभ व वस्तुनिष्ठ करण्याचा प्रयत्न केला आहे व त्याची गुणविभागणी सात श्रेणीमध्ये पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**शाळेसाठी श्रेणी निश्चितीचे निकष**

| टक्केवारी | 0 ते 40% | 41 ते 50% | 51 ते 60 % | 61 ते 70 % | 71 ते 80 % | 81 ते 90 % | 91 ते 100 % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | 0 ते 120 | 121 ते 150 | 151 ते 180 | 181 ते 210 | 211 ते 240 | 211 ते 240 | 271 ते 300 |
| श्रेणी | ड | क–2 | क–1 | ब– 2 | ब–1 | अ–2 | अ–1 |

संशोधनाने वरील/सदर साधनाच्या मदतीने शाळेच्या विकासाची परिणामकारकता तपासण्यासाठी प्राथमिक शाळा विद्यामंदीर, शिंदेवाडी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर या शाळेची नमुना निवड करुन या शाळेच्या विकासाची कार्यवाही, गुणांकन व श्रेणीनिश्चिती पुढीलप्रमाणे दिली आहे व त्यावरुन निष्कर्ष मांडले आहेत.

## संशोधनाचे उद्दिष्ट

शाळेचे सातत्यपूर्ण मूल्यमापन करण्यासाठी ' माझी समृध्द शाळा ' साधनाच्या सहाय्याने शाळेच्या विकासाची परिणामकारकता तपासणे.

## गृहितके

प्रत्येक महिन्याला ' माझी समृध्द शाळा ' साधनाच्या सहाय्याने शाळेचे मूल्यमापन करता येते.

## परिकल्पना

या साधनाचा वापर केल्याने शाळेच्या विकासात व गुणवत्तेत वाढ होत जाते.

## संशोधन पध्दती

सदर संशोधनासाठी प्रायोगिक पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे व एकगट पूर्व उत्तर चाचणी या अभिकल्पाचा वापर केलेला आहे.

## संशोधन साधने

सदर संशोधनासाठी या साधनाच्या सहाय्याने पूर्व चाचणी व उत्तर चाचणी घेण्यात आली.

## नमुना निवड

सदर संशोधनासाठी जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा विद्यामंदीर, शिंदेवाडी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर या शाळेची नमुना निवड करण्यात आली.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

## संशोधनाची कार्यवाही

संशोधकाने सदर शाळेचे मुख्याध्यापकांच्या सहाय्याने डिसेंबर 2012 महिन्याचे पूर्व मूल्यांकन केले. मूल्यमापन करतांना सदर साधन समोर ठेवून प्रत्येक निकषासाठी स्तरानुसार गुण दिले. ज्या निकषासाठी कमी गुण मिळाले त्यासाठी जानेवारी महिन्यापासून प्रयत्न सुरु केले शक्य होणा—या निकषांच्या पूर्ततेसाठी विविध उपक्रम हाती घेऊन कार्यवाही केली व त्यानंतर संशोधकाने एप्रिल 2013 या महिन्याचे उत्तर मूल्यांकन केले तेंव्हा प्राप्त गुणांमध्ये वाढ झाल्याचे आढळून आले. डिसेंबर व एप्रिल संकलित प्राप्त गुण नोंद तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

### माझी संमृध्द शाळा

तक्ता क. 5 अ – क्षेत्रनिहाय व स्तरनिहाय शाळा – गुणनोंद संकलन

शाळा : विद्यामंदिर शिंदेवाडी, ता.भुदरगड,जि.कोल्हापूर   माहे : डिसेंबर 2012

| अ.नं. | क्षेत्र | गुण | स्तर 1 | स्तर 2 | स्तर 3 | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा | 86 | 24 | 30 | 6 | 60 |
| 2 | लोकसहभाग | 24 | 6 | 10 | 6 | 22 |
| 3 | शैक्षणिक संधिची समानता | 33 | 6 | 12 | 15 | 33 |
| 4 | शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन | 157 | 28 | 42 | 48 | 118 |
| 5 | एकूण | 300 | 64 | 94 | 65 | 233 |
| | | | | | | ब |

**शाळा** :विद्यामंदिर शिंदेवाडी, ता.भुदरगड,जि.कोल्हापूर   माहे : **एप्रिल 2013**

| अ.नं. | क्षेत्र | गुण | स्तर 1 | स्तर 2 | स्तर 3 | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा | 86 | 24 | 36 | 6 | 66 |
| 2 | लोकसहभाग | 24 | 6 | 12 | 6 | 24 |
| 3 | शैक्षणिक संधिची समानता | 33 | 6 | 12 | 15 | 33 |
| 4 | शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन | 157 | 23 | 48 | 53 | 124 |
| 5 | एकूण | 300 | 59 | 108 | 80 | 247 |
| | | | | | | अ |

तक्ता : क्षेत्रनिहाय व स्तर निहाय शाळा गुणनोंद संकलन

## संकलित माहितीचे विश्लेषण

वरील गुणनोंद तक्ता व आलेखावरुन असे दिसून येते की,

1) पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा क्षेत्रामध्ये पूर्वचाचणीमध्ये तीन स्तराचे एकूण गुण 60 तर उत्तर चाचणीत ग्रंथालय व वित्तिय व्यवस्थापनाकडे लक्ष दिल्याने गुण वाढून 66 गुण मिळालेले आहे.

2) लोकसहभाग क्षेत्रामध्ये पूर्व चाचणीत तीन स्तराचे एकूण गुण 22 आहेत. तर उत्तर चाचणीत शाळा व्यवस्थापन समिती व शाळा आणि समाज परस्पर संबंध याबाबतीत जागरुक राहिल्याने यांच्या गुणांमध्ये वाढ होऊन पूर्ण 24 गुण मिळालेले आहेत.

3) शैक्षणिक संधीची समानता क्षेत्रामध्ये डिसेंबर मधील पूर्व चाचणीत पूर्ण गुण 33 आहेत व एप्रिलमध्येही पूर्व उत्तरचाचणीत 33 गुण मिळालेले आहेत.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

4) शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन क्षेत्रामध्ये पूर्व चाचणीत तीन स्तराचे एकूण गुण 118 तर उत्तर चाचणीत या क्षेत्रातील शिक्षक व्यक्तिमत्व विकास व अध्ययन –अध्यापन प्रक्रिया या विकास घटकामध्ये सुधारणा केल्याने उत्तर चाचणीत 124 गुण प्राप्त झाले आहेत.

वरील सर्व गुणांचे एकत्रिकरण करत सदर शाळेने पूर्वचाचणीत 233 गुण मिळवून ब–1 श्रेणी प्राप्ती केली होती. तर विविध विकास घटक साधन गुणात वाढ होण्यासाठी प्रयत्नशील राहून उत्तर चाचणीत 247 गुण मिळवून अ–2 श्रेणी संपादन केली आहे. ही शाळा अशीच क्षेत्रनिहाय विकास घटकात प्रगती करत गेल्यास एप्रिल 2014 अखेर अ–1 श्रेणी संपादन करेल हे निश्चितच !

## निष्कर्ष

यावरुन असा निष्कर्ष निघतो की जिल्हापरिषद प्राथमिक शाळा, विद्यामंदीर, शिंदेवाडी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर या शाळेच्या विकासात वाढ झालेली आहे व उरलेले गुण मिळविण्यासाठी ही शाळा अधिक कार्यरत आहे.

अशाप्रकारे 'माझी समुध्द शाळा ' या साधनाच्या सहाय्याने स्वतःच स्वतःच्या शाळेचे सातत्यापूर्ण मूल्यमापन, फेरमूल्यमापन करत ' माझ्या स्वप्नातील, माझी समृध्द शाळा ' सत्यात उतरण्यास प्रयत्नशिल राहून शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचीवर नेण्यासाठी या साधनाचा आधार म्हणजे शिक्षकास मिळालेले प्रभावशाली साधनरुपाचे वरदानच होय.

## संदर्भ

- माझी संमृध्द शाळा– महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे – 30